शासकीय वाहन चालकांना देण्यात येणा-या अतिकालिक भत्त्यामध्ये वाढ.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,

शासन निर्णय क्रमांक: अकाभ-१३९०/सीआर ३४/सेवा-९,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९१.

पहा :- शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: जीसीएस-१३८०/सीआर ११११/एसईआर-९, दिनांक २६ एप्रिल, १९८२.

शासन निर्णय :- सध्या शासनाचे विविध विभाग व त्याखालील निरनिराळी कार्यालये यातील वाहनचालकांना कामाच्या दिवशी विहित ९ तासांच्या कामाच्या वेळेपेक्षा जास्त वेळ काम केल्यास प्रत्येक तासाला रु.२/- (अर्धा तास किंवा जास्त काम केल्यास तो पूर्ण तास धरुन) या दराने शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: जीसीएस १३८०/सीआर ११११/एसईआर-९, दिनांक २६ एप्रिल, १९८२ अन्वये अतिकालिक भत्ता मंजूर करण्याबाबतचे आदेश आहेत. वाहनचालकांना मिळणा-या अतिकालिक भत्त्याच्या दरामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, वाहनचालकांना मिळणारा प्रत्येक तासाला रु.२/- हा अतिकालिक भत्त्याचा दर दिनांक १ सप्टेंबर १९९१ पासून प्रत्येक तासाला रु.४/- याप्रमाणे वाढविण्यात यावा. वाढीव दराने अतिकालिक भत्ता मिळण्याबाबतच्या अटी व शर्ती या वर उल्लेखिलेल्या दिनांक २६ एप्रिल, १९८२ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मध्ये विहित केल्याप्रमाणे राहतील.

२. सध्या अतिकालिक भत्ता मिळण्यास पात्र होण्यासाठी वाहन चालकांनी मागील ६ महिन्यांच्या कालावधीत दर महिन्यात सरासरी किमान १० दिवस अतिरिक्त काम करणे आवश्यक आहे. वाहनचालकांना अतिकालिक भत्त्यास पात्र होण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेली ही अट काढून टाकण्याचा प्रश्नही शासनाच्या विचाराधीन होता. शासन आता असा आदेश देत आहे की, वरील सुधारित दरानुसार अतिकालिक भत्ता मंजूर करताना यापुढे वरील अटीचा आग्रह धरण्यात येऊ नये व जे वाहनचालक दिनांक २६ एप्रिल, १९८२ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद २ मधील अटींची पूर्तता करतील अशा सर्व वाहनचालकांना या शासन निर्णयाद्वारे सुधारित करण्यात आलेल्या दराने अतिकालिक भत्ता मंजूर करण्यात यावा.

३. वर उल्लेखिलेल्या दिनांक २६ एप्रिल १९८२ च्या शासन निर्णयान्वये वाहनचालकांना अतिकालिक भत्ता देण्याबाबतचे अधिकार विभाग प्रमुखांना देण्यात आले होते. आता वरील सुधारित दराने व सुधारित पध्दतीनुसार वाहनचालकांना अतिकालिक भत्ता मंजूर करण्याचे अधिकार वाहनचालक ज्यांचे नियंत्रणाखाली काम करतात त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना देण्यात यावेत.

४. या सुधारीत दरामुळे येणारा खर्च संबंधित विभागांच्या/कार्यालयांच्या त्या त्या लेखाशीर्षाखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ. ना. कुळकर्णी,
शासनाचे उप सचिव.

शा. म. मु. रोटा/एच-४१६(१२००० + १०-१०-९१)

(कृ. मा. प.)